# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

**(निवडणूक कक्ष)**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रवीन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी: कार्यालय: ०७१२–२५२२९९१ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


## अधिसूचना

**क्रमांक:** रातुमनावि/निक/१७/स/५ दिनांक: २२ ऑगस्ट २०१७

असे निदर्शनास आले आहे की, विद्यापीठ अधिसूचना क्रमांक रातुमनावि/साप्र/निक/१५/४, दिनांक ५ जून २०१५ आणि रातुमनावि/साप्र/निक/१७/३, दिनांक १२ जुलै २०१७ नुसार काही महिला पदवीधरांनी नोंदणीकृत पदवीधरांच्या नोंदवहीत नोंद करण्याकरिता सादर केलेल्या अर्जावर विवाहानंतरचे नाव नमूद करून विवाहापुर्वीचे नाव असलेल्या पदवीची प्रत अर्जासोबत संलग्न केलेली आहे. त्यामुळे अर्जदाराचे नाव आणि पदवीवरील नाव यामध्ये तफावत असल्यामुळे असे अर्ज अवैध ठरतील.

करिता, संबंधीत महिला पदवीधर अर्जदारांना या अधिसूचनेद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी विवाहानंतर त्यांचे नाव बदलण्याविषयीचे शासनाचे राजपत्र किंवा नाव बदलण्याविषयीच्या विद्यापीठ अधिसूचनेची साक्षांकीत प्रत किंवा न्यायालयीन प्रतिज्ञापत्राची (Court Affidavit) मूळ प्रत **दिनांक ३१ ऑगस्ट २०१७ पर्यंत कामाचे दिवशी सकाळी ११.३० ते सायंकाळी ५.०० या कालावधीत** विद्यापीठाच्या निवडणूक कक्षात सादर करावी. तसेच यापुढे पदवीधर नोंदणीसाठी अर्ज करणाऱ्या महिला पदवीधरांनी या सूचनेची नोंद घेऊन आपला अर्ज विहीत मुदतीत सादर करावा. अन्यथा अशा स्वरूपाचे पदवीधर नोंदणीसाठी प्राप्त झालेले अर्ज अवैध ठरविण्यात येतील.

मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव